**प्रेस नोट दिनांक २७/०४/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**हरविलेल्या ५ वर्षीय मुलाचे नातेवाईकांचा तात्काळ शोध घेवून,**

**मुलास नातेवाईकांच्या सुखरूप ताब्यात.**

---

दि. २५.०४.२०१९ रोजी पो.उप.नि. मिसाळ, पो.हवा. मिसाळ, पोशि खरात असे खडक पोलीस ठाणे अंकित लोहियानगर पोलीस चौकीचे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पंडित जवाहरलाल नेहरू रोड याठिकाणी एक ५ वर्षीय रडत असलेल्या अवस्थेत मिळुन आला. सदर मुलाबाबत आजु-बाजुचे दुकानदार, रहिवाशी यांचेकडे चौकशी करता त्यांचे नातेवाईकांबाबत काहीएक उपयुक्त माहिती मिळुन आली नाही. सदर मुलास लोहियानगर पोलीस चौकी याठिकाणी आणुन त्याचेकडे विचारपुस करता त्याने त्याचे नाव युसूफ मुसा शेख रा. मलकापुर असे सांगितले.

सदर माहितीच्या आधारे नमुद कर्मचारी यांनी नियंत्रण कक्ष पुणे येथे मुलाचे नातेवाईकांचा शोध होणेकामी ब्रॉडकास्ट केला तसेच महाराष्ट्र पोलीस व्हॉट्सॲप ग्रुपवर सदर मुलगा मिळुन आल्याची पोस्ट पो.शि. पांडे यांनी पाठविली. सदर पोस्टवरून मलकापुर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोशि प्रविण संकपाळ यांनी मुलाचे बाबत माहिती काढुन त्याचे वडिलांचा मोबाईल क्रमांक ८६२४०२६४५७ हा लोहियानगर पोलीस चौकीचे पोलीसांना दिला. सदर मोबाईलवर नमुद कर्मचारी यांनी संपर्क करून मुलाचे वडिलांस पोलीस चौकीस बोलावुन घेवून त्याबाबत खातरजमा करून हरविलेल्या मुलास त्याचे आई-वडिलांचे ताब्यात सुखरूप परत देण्यात आलेल आहे.

